


# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्प २०१७-१८

# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

## समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : श्री. विवेक पंडित

अध्यक्ष : श्री. प्रविण महाजन

उपाध्यक्ष: श्री. आशिष कुलकर्णी

कार्याध्यक्ष: श्री. संतोष पाटील

सचिव : श्री. सुशील शुक्ल

**संपादन : मुक्ता भारती**

**विश्लेषण आणि संकलन:**
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९२७१७१४२८४

**मांडणी व अक्षरजुळणी :**
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१०-११ पासून २०१७-१८पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.


- विवेक पंडित

संस्थापक, समर्थन


९८२३१४७००३

pvivek2308@gmail.com

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान

आलेख क्र: १ राज्य अर्थसंकल्पाचे वाढते आकारमान

राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १२९५०० | १५४१२४ | १७०११० | १९४०६७ | २२४०५६ | २४३०२६ | २७०७६३ | ३००३९७ |
| सुधारित अंदाज | १३८५५२ | १५२८३९ | १७२०१८ | १९७१८७ | २३०९३२ | २४७३२४ | २८२४५४ | |
| प्रत्यक्ष खर्च | १३१००५ | १४९२२८ | १६५४६८ | १८७९८२ | २१७७४७ | २२५२८६ | | |

*( स्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : अर्थसंकल्प २०१७-१८, अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज २०१६-१७)*

- वर्ष २०१७-१८चा अर्थसंकल्प रु. ३ लाख ३९७ कोटींचा आहे. आधीच्या वर्षाच्या अर्थसंकल्पाशी म्हणजेच वर्ष २०१६-१७च्या सुधारित अंदाजाशी तुलना करता रु.१७ हजार ९४३ कोटींनी अधिक आहे.
- वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या कालखंडाचा विचार करता वर्ष २०११-१२, वर्ष २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ व वर्ष २०१५-१६ मधील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे रु. ४ हजार ८९६ कोटी, रु. ४ हजार ६४२, रु. ६ हजार ८५ कोटी, रु. ६ हजार ३०९ झाला होता. २०१५-१६ च्या आकडेवारीनुसार देखील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा रु. १७ हजार ७४० कोटींनी कमी झाला आहे.
- वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ मधील प्रत्यक्ष खर्च सुद्धा नेहमीच सुधारित अंदाजापेक्षा कमी झालेला आढळतो. वर्ष २०१६-१७ मध्येही तोच कल कायम राहणार आहे.
- **वर्ष २०१५-१६ मध्ये प्रत्यक्ष खर्च सुधारित अंदाजापेक्षा रु.२२ हजार ३८ ने कमी झाला आहे. तेवढ्या रकमेने खर्चात कपात झाली.**
- **सुधारित अंदाजांपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी याचाच अर्थ निधीची उपलब्धता न झाल्याने खर्चाला लावलेली कात्री म्हणावी लागेल.**

## अंदाजित व प्रत्यक्ष यातील तफावतीसह

## महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०१४-१५ व २०१५-१६

तक्ता:क्र.१ *रु. कोटीत*

| अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष रकमा | तफावत वाढ वा घट | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष रकमा | तफावत वाढ वा घट |
|---|---|---|---|---|---|
| **महसुली जमा** | | | | | |
| **२०१४-१५** | | | **२०१५-१६** | | |
| १८०३२०.१६ | १६५४१५.४६ | -१४९०४.०७ | १९८२३०.५० | १८५०५५.६८ | -१३१९४.८२ |
| **महसुली खर्च** | | | | | |
| १८४४२३.२८ | १७७५५३.११ | -६८७०.१७ | २०१९८७.९० | १९०३७४.०५ | -११६१३.८५ |
| **महसुली तूट** | | | | | |
| ४१०३.१२ | १२१३७.६६ | ८०३४.५४ | ३७५७.४० | ५३३८.३७ | १५८०.९७ |
| **एकूण खर्च** | | | | | |
| २१२३२१.२३ | १९८२१७.१३ | -१४१०४.१० | २३००६१.९६ | २१३२०८.४० | -१६८५३.५६ |
| **योजनांतर्गत** | | | | | |
| ६७५३३.७७ | ४८३३०.०८ | -१९२०३.६९ | ७१६३७.२८ | ५६७००.९७ | १४९३६.३१ |
| **योजनेतर** | | | | | |
| १४४७८७.४६ | १४९८८७.०४ | ५०९९.०० | १५८४२४.६८ | १५७५८०.८७ | -८४३८१.०० |
| **राजकोषीय तूट** | | | | | |
| ३०९६५.२६ | ३१८२६.५९ | ८६१.३३ | ३०७३३.०० | २८३६४.१५ | २३६८.८५ |

**राज्यावरील एकूण कर्ज**

| २०१४-१५ (प्र.) | २०१५-१६(प्र.) | २०१६-१७(सु.) | २०१७-१८(अं) |
|---|---|---|---|
| २९४२६१.०० | ३२४२०२.०० | ३७१०४७.०० | ४१३०४४.०० |
| **वेतन** | | | |
| ६२१२३.०० | ६८४५१.०० | ७५७४९.०० | ८७१४७.०० |
| **निवृत्ती वेतन** | | | |
| १७३८५.०० | १८६४३.०० | २३२९०.०० | २५५६७.०० |
| **कर्जावरील व्याज** | | | |
| २३९६५.०० | २५७७१.०० | २८८३०.०० | ३१०२७.०० |
| **महसुली जमेशी वेतन/निवृत्ती वेतन/व्याज यांची टक्केवारी** | | | |
| ६२.५५ | ६१.०० | ५८.१२ | ५८.९७ |

## महसुली जमा, महसुली खर्च आणि महसुली तूट याचे टिपण

महसुली जमा, महसुली खर्च आणि महसुली तूट याचा २०१७-१८चा अंदाज आणि मागील तीन वर्षांचा अनुभव पाहता, महसुली जमा कमी होणार. त्याचप्रमाणे अंदाजापेक्षा खर्चही कमी होणार आणि त्याचवेळी अंदाजापेक्षा तूटही वाढणार. त्यामुळे प्रत्यक्षात दिसणारी तूट आणि खर्च केला असता येणारी तूट ही पाहता तुटीचे प्रमाण कितीतरी अधिक होईल. उदा. महसुली जमेच्या अंदाजापेक्षा मागील वर्षांचा कल पाहता महसुली जमा १८ हजार कोटीने कमी जमा होईल तसेच महसुली खर्चही १० हजार कोटीने कमी होईल आणि महसुली तूट मात्र १५ हजार कोटीने वाढलेली असेल. याचा अर्थ अंदाजित खर्च झाला असता तर ही तूट ४५ हजार कोटींवर गेली असती.

याचा अर्थ मांडला गेलेल्या अर्थसंकल्पाच्या आकडेवारीची व त्याच्या टक्केवारीची विविध विभागाना दिलेला अर्थसंकल्पीय अंदाज आपण कितीही चर्चा केली तरी वर्ष संपता आजचे दिसणारे अर्थसंकल्पाचे स्वरुप पूर्णत: भिन्न झालेले असेल. नियोजनाप्रमाणे खर्च होणार नाही. आणि आर्थिक शिस्तदेखील कितीही प्रयत्न केले तरी अर्थमंत्री लावू शकणार नाहीत हे यातील वास्तव आहे.


२०१७-१८मध्ये महसुली जमा २,४३,७३७.५४ कोटी असेल असा अंदाज व्यक्त केला आहे. मागील अनुभव लक्षात घेता हा अंदाज अधिकचा केला असे म्हणता येईल. २०१४-१५ मध्ये अंदाज १,८०,३२०.१६ कोटी इतका होता. प्रत्यक्षात १,६५,४१५.४६ कोटी इतका जमा झाला. म्हणजेच १४,९०४.०७ कोटी इतका अंदाजापेक्षा कमी झाला. तर २०१५-१६ मध्ये अंदाज १,९८,२३०.५० कोटी इतका होता. तर प्रत्यक्षात १,८५,०३५.६८ कोटी इतका जमा झाला. म्हणजेच १३,१९४ कोटी इतका महसुली जमा अंदाजापेक्षा कमी झाला.

**आपले म्हणणे केवळ सत्याचे असून पुरेसे नाही,**
**सत्यामागे संघटनेचे सामर्थ्य पाहिजे !**

**- स्व. एसेम. जोशी**

# योजना: अंदाजित पेक्षा प्रत्यक्ष खर्च सातत्याने कमी होत जातोय!

आलेख क्र. २ **राज्य अर्थसंकल्पातील योजनांतर्गत खर्च**




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ३६५९७ | ४५७९६ | ४९७१५ | ५२५२९ | ५६९५१ | ७१६३७ | ७४४०२ |
| सुधारित अंदाज | ३८०६० | ४०६१० | ४४९४२ | ५१०८६ | ६१५८४ | ७१६२५ | ८११९२ |
| प्रत्यक्ष खर्च | ३३२५६ | ३७५०७ | ४०३२३ | ४५१५२ | ४८३३० | ५६७०० | |

*स्रोत: खर्चाचे प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा* *टीप : अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज २०१६-१७*

- **वर्ष २०१७-१८चा अर्थसंकल्पात योजनांतर्गत व योजनेतर असा खर्च दाखविण्यात आलेला नसून केवळ संपूर्ण अर्थसंकल्प अंदाजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे या आलेखात तसा खर्च दाखविलेला नाही.**
- **वर्ष २०१६-१७ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ७४ हजार ४०२ कोटी होते. मात्र त्याचवर्षी सुधारित अंदाज रु. ८१ हजार १९२ कोटी केलेले आहेत म्हणजे सुधारित अंदाजात रु.६७९० कोटींची वाढ झाली आहे.**
- **वर्ष २०१५-१६ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ७१ हजार ६३७ कोटी होते. मात्र त्या वर्षी उपलब्ध झालेला निधी हा रु. ५६ हजार ७०० कोटी होता. म्हणजेच रु. १४ हजार ९३७ कोटींचा निधी (२०.८५%) कमी उपलब्ध झाला होता.**
- **वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या ६ वर्षाच्या कालावधीत सरासरी रु. ५२ हजार २०४ कोटी योजनेसाठी अंदाजित केले गेले व सरासरी केवळ रु. ४३ हजार ५४४ कोटी इतकाच निधी उपलब्ध झाला. सरासरी रु. ८ हजार ६६० कोटी निधी कमी उपलब्ध झाला.**
- **वरील आलेख पाहता राज्य शासन मागील ६ वर्षात एकाही वर्षी अर्थसंकल्पीय अंदाजा इतका वा त्यापेक्षा जास्त निधी 'राज्यातील योजनांसाठी' उपलब्ध करून देऊ शकले नाही.**


**डॉ. रंगराजन समितीने अर्थसंकल्पातील योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याची शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासनाने वर्ष २०१७-१८च्या अर्थसंकल्पात योजनांतर्गत व योजनेतर विभाजन दाखविणे बंद केले आहे.**

# राज्यातील योजनांसाठी २५ टक्केही खर्च नाही!

**योजनेतर खर्च :** योजनेतर खर्चात सर्वसाधारणपणे राज्याचे सर्व विकासेतर खर्च भागविले जातात. उदा. कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन कायदा सुव्यवस्था व कर वसुली यावर येणारा खर्च, सामान्य प्रशासनावर येणारा खर्च इत्यादी.

**योजनांतर्गत खर्च :** राज्याच्या वार्षिक योजनेअंतर्गत असलेला खर्च हा संपूर्णपणे विकासात्मक खर्च असतो.


आलेख क्र. ३ **एकूण अर्थसंकल्पातील खर्चातील योजनांतर्गत व योजनेतर खर्च** *रु. कोटीत*




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनांतर्गत | ३३२५६ | ३७५०७ | ४०३२३ | ४५१५२ | ४८३३० | ५६७०० | ८११९२ |
| योजनेतर | ९७७४९ | १११७२१ | १२५१४५ | १४२८२९ | १६९४१७ | १६८५८५ | २०१२६२ |

*स्रोत: खर्चाचे प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा टीप : अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज २०१६-१७*

- वर्ष २०१६-१७च्या अर्थसंकल्पात योजनेतर खर्चाचे प्रमाण ७१.२५ टक्के असून **योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण केवळ २८.७५% एवढे अल्प आहे.**
- वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीत राज्याच्या एकूण अर्थसंकल्पामध्ये एकाही वर्षी योजनांतर्गत खर्च ३४ टक्के करण्यात आलेला नाही तर योजनेतर खर्च मात्र ६६ टक्क्यांहून अधिक राहिला आहे. **तर या कालावधीत योजनांतर्गत सरासरी खर्च २४.२६% आहे**
- वर्ष २०१५-१६ मधील अर्थसंकल्पातून उपलब्ध झालेला निधी रु. २ लाख २५ हजार २८६ कोटी होता. त्यामध्ये योजनेतर खर्च रु. १ लाख ६८ हजार ५८५ कोटी (७४.८४%) झाला तर योजनांतर्गत खर्च केवळ रु. ५६ हजार ७०० कोटी (२५.१६%) झाला.
- वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीत उपलब्ध झालेला एकूण सरासरी निधी रु. १ लाख ७९ हजार ५३१ कोटी एवढा होता. त्यात योजनेतर सरासरी खर्च रु. १ लाख ३५ हजार ९८७ कोटी एवढा झाला तर योजनांतर्गत सरासरी खर्च रु. ४३ हजार ५४४ कोटी एवढा झाला.





**वर्ष २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाने योजनांर्तगत व योजनेतर खर्च वेगवेगळा दाखविलेला नाही परंतु २०१५-१६चे प्रत्यक्ष योजनांर्तगत व योजनेतर खर्चाचे प्रमाण लक्षात घेता योजनांर्तगत व योजनेतर खर्च काढण्याचा प्रयत्न केला आहे.**

*स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज २०१६-१७*

# राजकोषीय स्थैर्य

महसुली व राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे शासनाच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार शासनास महसुली तूट २००८-०९ पर्यंत शून्यावर व राजकोषीय तूट राज्य स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात ३ टक्क्यांवर आणावयाची होती. वर्ष २००६-०७ पासून अनेक खटपटी करून शासनाने हे उद्दिष्ट साध्य केले होते.

आलेख क्र: ५ **तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण**




*(स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प वर्ष २०१७-१८, अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज २०१६-१७)*

**वर्ष २०१६-१७चे सुधारित आणि वर्ष २०१७-१८चे अर्थसंकल्पीय अंदाज पाहता महसुली तूट अनुक्रमे ०.६ व ०.२ इतकी राहणार असून राजकोषीय तूट अनुक्रमे २.२ व १.५ इतकी असणार असे अंदाज दिलेले आहेत.**

## राजकोषीय तूट महसुली तूट व स्थूल राज्य उत्पन्नातील बदलते स्वरुप

तक्ता क्र.१ (रु. कोटीत)

| वर्ष | राजकोषीय तूट (प्रमाण) | महसुली तूट (प्रमाण) | स्थूल राज्य उत्पन्न |
|---|---|---|---|
| २००८-०९ | १४०१७ (१.९) | -५५७७(-०.७) | ७,५३,९६९ |
| २००९-१० | २६१८१ (३.१) | ८००६ (०.९) | ८,५५,७५१ |
| २०१०-११ | १८८५७ (१.८) | ५९१ (०.१) | १०,४९,१५० |
| २०११-१२ | १९९६९ (१.७) | २२६८ (०.२) | १२,७५,९४८ |
| २०१२-१३ | १३७३९ (१.०) | -४२११ (-०.३) | १४,५४,६१२ |
| २०१३-१४ | २६०१८ (१.७) | ५०८१ (०.३) | १६,४६,०४३ |
| २०१४-१५ | ३१८२७ (१.८) | १२१३८ (०.७) | १७,७३,७४४ |
| २०१५-१६ | २८३८१ (१.४) | ५३३८ (०.३) | २०,०१,२२३ |
| २०१६-१७ | ५०३१८ (२.२) | १४३७८ (०.६) | २२,६७,७८९ |
| २०१७-१८ | ३८७८९ (१.५) | ४५११ (०.२) | २५,३९,९२४ |

*(कंसातील आकडे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण दर्शवितात. तक्ता व आलेख यांचा स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१७-१८, अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८ व सुधारित अंदाज २०१६-१७)*

# एकूण खर्चामध्ये महसुली - भांडवली व
# विकास - विकासेतर खर्चाचा तपशील

*तक्ता क्र: २* — *रु. कोटीत*

| | महसूली खर्च | | | भांडवली खर्च | | | एकूण खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | विकास | विकासेतर | एकूण | विकास खर्च | विकासेतर | एकूण | विकास खर्च | विकासेतर खर्च | एकूण |
| २००१-०२ | २०५५०.९८ | १७७३०.५४ | ३८२८१.५२ | ३००७.२७ | १३६२२.५५ | १६६२९.८२ | २३५५८.२५ | ३१३५३.०९ | ५४९११.३४ |
| २००२-०३ | २२५२७.५० | १७९४६.८ | ४०४७४.३० | ५३८७.७६ | १५३५२.८४ | २०७४०.६० | २७९१५.२६ | ३३२९९.६४ | ६१२१४.९० |
| २००३-०४ | २२८५९.९८ | १९८२०.०८ | ४२६८०.०६ | १०१०१.१३ | १७५७४.५४ | २७६७५.६७ | ३२९६१.११ | ३७३९४.६२ | ७०३५५.७३ |
| २००४-०५ | २८७७५.५१ | २२२७१.१५ | ५१०४६.६६ | १०६२७.६४ | १४५३१.८६ | २५१५९.५० | ३९४०३.१५ | ३६८०३.०१ | ७६२०६.१६ |
| २००५-०६ | ३०५८३.३४ | २१६९६.५१ | ५२२७९.८५ | १४३४०.०६ | ५७४१.६५ | २००८१.७१ | ४४९२३.४० | २७४३८.१६ | ७२३६१.५६ |
| २००६-०७ | ३६२७८.९८ | २५१०६.३० | ६१३८५.२८ | १२४१३.८० | ४७०६.४५ | १७१२०.२५ | ४८६९२.७८ | २९८१३.०५ | ७८५०५.८३ |
| २००७-०८ | ४०९३३.६३ | २३८४६.४२ | ६४७८०.०५ | १२७१४.७६ | ४६९९.११ | १७४१३.८७ | ५३६४८.३९ | २८५४५.५३ | ८२१९३.९२ |
| २००८-०९ | ४९११०९.२१ | २६५८४.७१ | ७५६९३.९२ | २०८०३.८० | ४२१४.५१ | २५०१८.३१ | ६९९१३.०१ | ३०७०९.२२ | १००६२२.२३ |
| २००९-१० | ६२८४५.०१ | ३२०७०.९६ | ९४९१५.९७ | १८६८९.७४ | ४१७५.३९ | २२८६५.१३ | ८१५३४.७४ | ३६२४६.३५ | ११७७८१.०९ |
| २०१०-११ | ६८७५५.१५ | ३७७०४.२३ | १०६४५९.३८ | १८९२२.४५ | ५६२३.६१ | २४५४६.०५ | ८७६७७.५९ | ४३३२७.८३ | १३१००५.४३ |
| २०११-१२ | ८०७०१.३१ | ४२८५२.८८ | १२३५५४.१९ | १८७१५.८२ | ६९५८.३५ | २५६७४.१८ | ९९४१७.१४ | ४९८११.२३ | १४९२२८.३७ |
| २०१२-१३ | ९१०७०.३१ | ४७६६५.६७ | १३८७३५.९८ | १८८१३.९२ | ७९१९.०२ | २६७३२.९४ | १०९८८४.२३ | ५५५८४.६८ | १६५४६८.९२ |
| २०१३-१४ | १००९२३.१५ | ५३९७९.२७ | १५४९०२.४२ | २१६६५.५४ | ११४१४.१९ | ३३०७९.७३ | १२२५८८.६९ | ६५३९३.४६ | १८७९८२.१५ |
| २०१४-१५ | ११७०६७.३५ | ६०४८५.७७ | १७७५५३.१२ | २०६६४.०१ | १९५३०.६८ | ४०१९४.६९ | १३७७३१.३६ | ८००१६.४५ | २१७७४७.८१ |
| २०१५-१६ | १२६००४.२९ | ६४३६९.७६ | १९०३७४.०५ | २३९०७.७९ | ११००५.१० | ३४९१२.८९ | १४९९१२.०८ | ७५३७४.८६ | २२५२८६.९४ |
| २०१६-१७ | १५९०३१.७२ | ७५३७५.९४ | २३४३८९.६६ | ३७०५८.८४ | ११००६.०५ | ४८०६४.८९ | १९६०९०.५६ | ८६३६३.९९ | २८२४५४.५५ |
| २०१७-१८ | १६५९२४.२१ | ८२३२४.५२ | २४८२४८.७३ | ३५५०४.३६ | १६६४४.५८ | ५२१४८.९४ | २०१४२८.५७ | ९८९६९.१० | ३००३९७.६७ |

*स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१७-१८ टीप :* सुधारित अंदाज २०१६-१७ , अर्थसंकल्पीय अंदाज *२०१७-१८*

- **राज्याचा वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ३ लाख ३९७ कोटींचा एकूण अंदाजित खर्च होईल असे शासन सांगत असून त्यामध्ये रु. २ लाख ४८ हजार २४८ कोटींचा महसूली खर्च असून रु. ५२ हजार १४८ कोटींचा भांडवली खर्च अंदाजित केला आहे.**

- **राज्याचा वर्ष २०१५-१६ मधील प्रत्यक्ष खर्च पाहिला असता एकूण खर्च रु.२ लाख २५ हजार २८६ कोटी असून त्यामध्ये रु. ३४ हजार ९१२ कोटींचा भांडवली केलेला खर्च आहे व रु. १ लाख ९० हजार ३७४ कोटींचा महसूली खर्च केलेला आहे.**

- **राज्याने वर्ष २०१५-१६ मध्ये एकूण खर्च रु. २ लाख २५ हजार २८६ कोटी असून त्यामध्ये रु.१ लाख ४९ हजार ९१२ कोटी विकास खर्च व रु. ७५ हजार ३७५ कोटी विकासेतर खर्च आहे.**

## राज्य शासनाने रु.७५ हजार ८७४ कोटी ८९ लाखाच्या महसुलावर पाणी सोडले

### निर्विवाद रकमांची वसुली विवादास्पद!

*तक्ता क्र. ३* *रु. कोटीत*

| तपशील | २०१४-१५ | २०१५-१६ | वाढ |
|---|---|---|---|
| कर महसुलातील वसूल न केलेल्या विवादास्पद रकमा | ३४४९०.५५ | ५११७०.५५ | १६६८०.०० |
| कर महसुलातील वसूल न केलेल्या निर्विवाद रकमा | २५२२४.९२ | २१६३०.०६ | -३५९४.०० |
| वसूल न केलेला करेतर महसूल | ३१९२.४४ | ३०७४.२८ | -११८.१६ |
| **एकूण** | **६२९०७.९१** | **७५८७४.८९** | **१२९६७.८४** |

*(स्त्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१७-१८)*


- **वर्ष २०१४-१५ पर्यंत वेगवेगळ्या करातून जमा होणारा कर त्याबाबतच्या विवादास्पद रकमा रु. ३४ हजार ४९० कोटी ५५ लाख इतक्या होत्या व निर्विवाद रकमा या रु. २५ हजार २२४ कोटी ९२ लाखांच्या होत्या. वर्ष २०१५-१६ मध्ये वाढ होऊन त्या अनुक्रमे रु. ५१ हजार १७० कोटी ५५ लाख व रु. २१ हजार ६३० कोटी ६ लाख इतक्या झाल्या आहेत.**
- **वर्ष २०१४-१५ मध्ये शासनाने रु. ६२ हजार ९०७ कोटी ९१ लाखांचा कर व करेतर महसूल जमा केला नव्हता उलट त्यात २१.१४ टक्क्यांनी वाढ होऊन तो वर्ष २०१५-१६ मध्ये ७५ हजार ८७४ कोटी ८९ लाख इतका झाला आहे.**

**वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यासारख्या बांधिल खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे महसुली तूट वाढत आहे. याचाच परिणाम होऊन भांडवली खर्चात आवश्यक त्या प्रमाणात वाढ करता येत नाही, ही चिंतेची बाब झाली आहे. करामध्ये अथवा करेतर महसुलामध्ये वाढ करण्यास असलेल्या मर्यादा विचारात घेता राज्यामुळे गुंतवणुकीस सुयोग्य वातावरण निर्माण करणे, अनुत्पादक खर्चास आळा घालणे, हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. जेणे करून राज्याच्या आर्थिक वाढीस हातभार लागेल.**

# राज्यावरील कर्ज

## राज्यावरील कर्ज रु.४ लाख १३ हजार ४४ कोटी!

*आलेख क्र: ६* *( रु. कोटीत)*




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यावरील एकूण कर्ज | २०३०९७ | २२५९७६ | २४६६९२ | २६९३५५ | २९४२६१ | ३२४२०२ | ३७१०४७ | ४१३०४४ |

*स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प - २०१७-१८* *टीप : कर्जाच्या आकडेवारीमध्ये व्याजाची रक्कम घेण्यात आली आहे.*

- राज्याचा कर्जाचा आलेख हा सातत्याने वाढताना दिसतो. वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१७-१८ मध्ये सरासरी कर्ज पहाता राज्याच्या डोक्यावर वर्षाला सरासरी रु. २ लाख ९३ हजार ४५९ कोटी इतके आहे.
- वर्ष २०१७-१८ मध्ये राज्याचे कर्ज ४ लाख १३ हजार ४४ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहे.

## शासनाने दिलेली हमी

शासनाने दिलेली हमी हे देखील शासनाचे दायित्व असते. अशी हमी कर्ज स्वरुपात असते. २०१४-१५ अखेर अदत्त असलेली रक्कम रु. ७ हजार ७७६ कोटी ५७ लाख इतकी असून हमीच्या एकूण नोंदी ५६३ आहेत.

## शासनाची वेगवेगळ्या प्रकारची दायित्वे

केंद्राकडून घेतलेली कर्जे, अल्पबचत निधीला विक्री केलेले कर्जरोखे, वित्तीय संस्था, बँका यांच्याकडून घेतलेली कर्जे, बाजारातून घेतलेली कर्जे, रिझर्व्ह बँकेकडून घेतलेला ओव्हर ड्राफ्ट, भविष्यनिर्वाह निधी, राखीव निधी, अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली कर्जे ही दायित्व शासनाची येतात. २०१५-१६च्या वर्ष अखेरीस ३ लाख २४ हजार २०१ कोटी ९७ लाख इतके दायित्व होते. तर २०१६-१७ ला ३ लाख ७१ हजार ४७ कोटी २ लाख इतके दायित्व असेल असे सुधारित अंदाज केले आहेत.


## अदत्त संकीर्ण दायित्वे

२०१५-१६ अखेर प्रमुख बांधकामे कंत्राटी व पुरवठा यांचे दायित्व ४ हजार ९१ कोटी २२ लाख तर पंचायत राज संस्थांसह विविध संस्थांना देय असलेल्या अनुदानाची थकबाकी २७६ कोटी ६० लाख इतकी आहे जे शासनाचे देणे आहे. *- स्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१७-१८*

# राज्यावरील सरासरी कर्जाचे प्रमाण स्थूल राज्य उत्पन्नाच्या १९ टक्के आहे

## राज्यावरील वाढत्या कर्जाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण

आलेख क्र: ७




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रमाण | २०.८४ | २०.७१ | २०.१० | १९.२४ | १७.७५ | १७.४८ | १७.६३ | १७.४८ |

*(स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प, २०१७-१८, अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज २०१६-१७)*

- **राज्यावरील कर्ज व व्याजाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असणारे प्रमाण पाहता वर्ष २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीतील वर्ष २०१०-११ मध्ये हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच २०.८४ टक्के इतके होते.**
- **वर्ष २०१५-१६ व २०१७-१८ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नामध्ये कर्ज व व्याजाचे प्रमाण सर्वात कमी म्हणजेच १७.४८ टक्के इतके अनुक्रमे उपलब्ध व अंदाजित करण्यात आलेले आहे.**

**राज्य शासनाचे कर्जावरील व्याजाचे महसुली जमेशी प्रमाण १० टक्केच्या आत ठेवणे आवश्यक आहे. परंतु वर्ष २०१५-१६ मध्ये महसुली जमेशी प्रमाण १३.९३टक्के होते.**

# राज्यातील प्रत्येक नागरिकावर
# ३९ हजार ५०८ रुपयांचे व्याजासह कर्ज!

### राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज

तक्ता क्र:४ (रु. कोटीत)

| वर्ष | राज्यावरील कर्ज व स्थूल राज्य उत्पन्न | | | | दरडोई कर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| | कर्ज | व्याज | एकूण कर्ज | स्थूल राज्य उत्पन्न | |
| २००५-०६ | १,२४,३६५ | १०,५२३ | १,३४,८८८ | ४,८६,७६६ | १२,९५७ |
| २००६-०७ | १,३३,७२२ | ११,९८३ | १,४५,७०५ | ५,८४,४९८ | १३,८९४ |
| २००७-०८ | १,४२,३८२ | १२,९३२ | १,५५,३१४ | ६,८४,८१७ | १४,८५६ |
| २००८-०९ | १,६०,६७३ | १३,०२७ | १,७३,७०० | ७,५३,९६९ | १५,८७७ |
| २००९-१० | १,८१,४४७ | १४,८३८ | १,९६,२८५ | ८,५५,७५१ | १७,८९२ |
| २०१०-११ | २,०३,०९७ | १५,६४८ | २,१८,७४५ | १०,४९,१५० | १९,४६१ |
| २०११-१२ | २,२५,९७६ | १७,५०५ | २,४३,४८१ | ११,७०,१२१ | २१,६६२ |
| २०१२-१३ | २,४६,६९२ | १९,०७६ | २,६५,७६८ | १३,२२,२२२ | २३,६४५ |
| २०१३-१४ | २,६९,३५५ | २१,२०७ | २,९०,५६२ | १५,१०,१३२ | २५,८५० |
| २०१४-१५ | २,९४,२६१ | २३,९६५ | ३,१८,२२६ | १७,९२,१२२ | २८,३११ |
| २०१५-१६ | ३,२४,२०२ | २५,७७१ | ३,४९,९७३ | २०,०१,२२३ | ३१,१३६ |
| २०१६-१७ | ३,७१,०४७ | २८,८३० | ३,९९,८७७ | २२,६७,७८९ | ३५,५७६ |
| २०१७-१८ | ४,१३,०४४ | ३१,०२७ | ४,४४,०७१ | २५,३९,९२४ | ३९,५०८ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१७-१८* *टीप :* अर्थसंकल्पीय अंदाज *२०१७-१८ ,* सुधारित अंदाज २०१६-१७*)*

*(टीप : राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी)*


राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाकडून आघाडी शासनाच्या हाती सत्ता आली त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या १७.२ टक्के) होता. वर्ष २००४-०५मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा निवडून आले त्यावेळी हा बोजा रु. १ लाख ९ हजार १६७ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या २८.३ टक्के) एवढा वाढला होता. त्यावरील व्याज रु. १० हजार २५८ कोटी मिळून एकूण कर्ज १ लाख १९ हजार ४२५ कोटी रुपये इतके झाले होते. आता युती शासनाकडे पुन्हा राज्याची धुरा आलेली असताना राज्यावरील कर्ज हे ४ लाख ४४ हजार ७१ कोटींचे आहे.

- **राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर असलेला कर्जाचा भार हा जवळ जवळ ३९ हजार ५०८ रुपये इतका आहे!**

# नंदुरबार, मुंबई या जिल्ह्यांमधील आर्थिक दरी वाढली !

## राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत राज्याचा असमतोल विकास

आलेख क्र. ८




*(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१६-१७)*

- **सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे नंदुरबार (रु. ६६,११०), वाशिम (रु.६६,४६२), हिंगोली (रु.६६,९९८), असून पुणे (रु. २,०४,०६०), ठाणे (रु. २,१७,०९४) व मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक रुपये २ लाख ५८ हजार ७४९ इतके आहे.**
- **मुंबई, ठाणे व पुणे यासारख्या महानगरांचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण दुर्गम जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी दाखविते.**

# राज्य अर्थसंकल्पाच्या ३३ टक्के खर्च वेतनावर

## राज्यातील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्या वेतनावरील खर्च

तक्ता क्र:५

| वर्ष २०१५-१६ | | |
|---|---|---|
| **कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग** | **कर्मचाऱ्यांची संख्या** | **वेतनावरील खर्च (कोटीत)** |
| शासन | ५,७१,०४९ | २७,६८५.६३ |
| शासकीय अनुदान प्राप्त संस्था | ९,१०,९३२ | ४१,२५५.६७ |
| सार्वजनिक क्षेत्रातील युनिटे | २,४५,८४० | ११,४३०.२० |
| **एकूण** | **१७,२७,८२१** | **८०,३७१.५०** |

*स्त्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण*

- **वर्ष २०१५-१६ मध्ये राज्याचा एकूण अर्थसंकल्पात झालेला खर्च रु. २ लाख २५ हजार २८६ कोटी आहे. मात्र त्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनावर तब्बल रु. ८० हजार ३७१ कोटी ५० लाख इतका खर्च करण्यात आला.**
- **राज्यात १ लाख ७७ हजार पदे रिक्त असून ही पदे भरण्यात आली तर राज्याच्या विकासासाठी निधीच उरणार नाही.**

## स्थूल राज्य उत्पन्न, महसुली व राजकोषीय तूट

- वर्ष २०१७-१८चे राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न हे रु. २५ लाख ३९ हजार ९२४ कोटी इतके अंदाजित असून राज्य स्थूल उत्पन्नाशी महसुली तुटीचे प्रमाण हे ०.२ टक्के आहे तर राजकोषीय तुटीचे प्रमाण हे १.५ टक्के इतके आहे.
- वर्ष २०१७-१८ची महसूली तूट रु. ४ हजार ५११ कोटी तर राजकोषीय तूट ही रु. ३८ हजार ७८९ कोटी इतकी आहे.

### कर्ज व व्याज :

- वर्ष २०१५-१६ मध्ये राज्यावर एकूण कर्ज (व्याजासहीत) रु. ३ लाख ४९ हजार ९७३ कोटींचे होते ते वर्ष २०१६-१७ मध्ये रु. ३ लाख ९९ हजार ८७७ कोटी इतके वाढले. राज्यावरील कर्जाचा बोजा हा वाढताच दिसतोय कारण आता वर्ष २०१७-१८मधील अंदाज पाहता ते कर्ज व्याजासहित रु. ४ लाख ४४ हजार ७१ कोटींवर आले आहे.
- राज्याचे कर्जावरील व्याज देखील वाढत आहे ते वर्ष २०१५-१६ मध्ये रु. २५ हजार ७७१ कोटी होते ते वर्ष २०१६-१७ मध्ये रु. २८ हजार ८३० कोटींचे झाले होते व २०१७-१८चे अंदाज पाहिले असता रु. ३१ हजार २७ कोटींचे व्याज फेडावे लागणार आहे.
- राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न वर्ष २०१७-१८ मध्ये रु. २५ लाख ३९ हजार ९२४ कोटींचे असले तरी त्यात १७.४८% कर्ज व १.२२% व्याज आहे.

## महसुली जमा व महसुली खर्च

तक्ता क्र.६ **महसूली जमा व खर्चाचे विवरण** रु. कोटीत

| बाब | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|
| महसुली जमा | १,४९,८२२ | १,६५,४१५ | १,८५,०३६ | २,२०,०१२ | २,४३,७३८ |
| महसुली खर्च | १,५४,९०२ | १,७७,५५३ | १,९०,३७४ | २,३४,३९० | २,४८,२४९ |
| वेतनावरील खर्च | ५९,७३५ | ६२,१२३ | ६८,४५१ | ७५,७४९ | ८७,१४७ |
| निवृत्तीवेतनावरील खर्च | १५,१८६ | १७,३८५ | १८,६४३ | २३,२९० | २५,५६७ |
| व्याज | २१,२०७ | २३,९६५ | २५,७७१ | २८,८३० | ३१,०२७ |
| वेतन + निवृत्तीवेतन+व्याज | ९६,१२८ | १,०३,४७३ | १,१२,८६५ | १,२७,८६९ | १,४३,७४१ |
| महसुली आधिक्य (+) तूट(–) | - ५,०८१ | -१२,१३८ | -५,३३८ | -१४,३७८ | -४,५११ |

(स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१७-१८, अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८, सुधारित अंदाज वर्ष २०१६-१७)

- **महसुली जमा व खर्च पाहिले असता राज्य शासनाने वर्ष २०१७-१८ मध्ये महसुली खर्च रु. २ लाख ४८ हजार ४५५ कोटी इतका होईल व रु. २ लाख ४३ हजार ७३० कोटींचा महसूल जमा होईल असे अंदाज वर्तविले आहेत.**
- **वर्ष २०१५-१६च्या प्रत्यक्ष रकमा पाहता राज्य शासनाचा महसुली खर्च हा जमेपेक्षा १.८१ टक्के जास्त आहे.**
- **महसुली जमेपैकी शंभरातील ३५.७५ पैसे वेतनावर १० रु. ८८ पैसे निवृत्ती वेतनावर १२ रु. ७२ पैसे व्याजावर खर्च होतात. म्हणजे राज्यात जमा झालेल्या एकूण महसुली जमेपैकी १००तील ६०.७७ पैसे केवळ सरकार चालविण्यासाठी वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज यावर खर्च होतो. त्यांच्या वाहनांचा खर्च व भत्ते, कार्यालयाची देखभाल व दुरुस्ती हा खर्च या खेरीज होत असतो.**

# २८ हजार ५६३ कोटींची बचत

## १००० कोटी रुपयांची आणि अधिक बचत

(रु. कोटीत)

| अक्र | अनुदान क्र. | अनुदानाचे नाव | एकूण तरतूद | प्रत्यक्ष खर्च | बचत | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बी ०१ | पोलीस प्रशासन | १०१७९.३१ | ८९२९.१४ | १२५०.१७ | १२.२८ |
| २. | ई०२ | सामान्य शिक्षण | ३५१०४.६५ | ३३४६५.१५ | १६३९.५० | ४.६७ |
| ३. | एफ०२ | नगरविकास व इतर प्रगत सेवा | ६१०७.९२ | ४५१५.०९ | १५९२.८३ | २६.०८ |
| ४. | एल०३ | ग्राम विकास कार्यक्रम | ६९२४.४९ | ३५०८०.३२ | १८४४.१७ | २६.६३ |
| ५. | एन ०३ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग आणि अल्पसंख्यांकांचे कल्याण | ८९२०.८८ | ७५२४.९७ | १३९५.९१ | १५.६५ |
| ६. | ओ ०४ | इतर ग्रामविकास कार्यक्रम | ६२८९.०८ | ०.०५ | ६२८९.०३ | १००.०० |
| ७. | आर ०१ | वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य | ८६५३.४१ | ६१००.४१ | २५५३.०० | २९.५० |
| ८. | टी ५ | जनजाती क्षेत्र विकास उपयोजनेवरील महसुली खर्च | ४६७५.५५ | ३५६१.३९ | १११४.१६ | २३.८३ |
| ९. | आय०५ | पाटबंधाऱ्यांवरील भांडवली खर्च | १०३९५.८७ | ७४०२.१२ | २९९३.७५ | २८.८० |
| १०. | एल०७ | ग्रामविकासावरील भांडवली खर्च | २४७१.२५ | ८७४.४२ | १५९६.८३ | ६४.६२ |
| ११. | एन ०४ | सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | १४५८.२९ | ४५०.३३ | १००७.९६ | ६९.१२ |
| १२. | ओ१० | इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च | ६११२.६१ | ८२६.५१ | ५२८६.१० | ८६.४८ |
| | | | १०७२९३.३१ | १०८७२९.९० | २८५६३.४१ | २६.६२ |

*स्त्रोत : विनियोजन लेख २०१४-१५*

- **१००० कोटी रुपयांपेक्षा अधिक बचत करणारे पोलीस, शिक्षण, नगर विकास, ग्राम विकास, सामाजिक न्याय, नियोजन आरोग्य, आदिवासी, पाटबंधारे या विभागांसाठी वेगवेगळ्या मागण्यांतर्गत १ लाख ७ हजार २९३ कोटी ३१ लाखांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी १ लाख ८ हजार ७२९ कोटी ९० लाख खर्च झाला तर २८ हजार ५६३ कोटी ४१ लाखांच बचत झाली आहे. हे प्रमाण २६.६२ टक्के आहे**

**विभागांना देण्यात येणारा निधी विभाग वेळेत खर्च करीत नाहीत आणि बचत झालेला निधी वेळेत परतही करीत नाहीत त्यामुळे तो निधी इतर महत्त्वाच्या योजनांसाठी खर्च होत नाही. त्यामुळे निधी अखर्चित राहाण्याचे प्रमाण वाढते. आणि सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी उदा. आदिवासी विकास, महिला बाल कल्याण, सामाजिक न्याय या विभागांच्या योजनांसाठी सरकारकडे पैसा उपलब्ध होत नाही.**

# शासकीय कंपन्यांचा संचित तोटा पोहोचला १७ हजार कोटींवर

(रु. कोटीत)

| अक्र | कंपनीचे नाव आणि क्षेत्र | या वर्षासाठीचा निव्वळ नफा/तोटा (सप्टेंबर २०१५) | तोट्यातील कंपन्यांचा एकूण संचयी तोटा |
|---|---|---|---|
| **अ) कार्यरत शासकीय कंपन्या** | | | |
| **कृषि आणि संलग्न कार्ये** | | | |
| १. | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित | (-)७.०० | (-)२०८.१५ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)७.००** | **(-)२०८.१५** |
| **वित्त** | | | |
| २. | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित | (-)४.०९ | (-)११८.२४ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)४.०९** | **(-)११८.२४** |
| **पायाभूत सुविधा** | | | |
| ३. | कोकण विकास महामंडळ मर्यादित | (-)०.८० | (-)१४.५१ |
| ४. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित | (-)१७३.१६ | (-)३२७१.१६ |
| ५. | मिहान इंडिया लिमिटेड | (-)३१.९५ | (-)२७.४४ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)२०५.९१** | **(-)३३१३.११** |
| **उत्पादन** | | | |
| ६. | महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित | (-)०.७६ | (-)१०.९१ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)०.७६** | **(-)१०.९१** |
| **वीज** | | | |
| ७. | एमएसईबी होल्डिंग कंपनी लिमिटेड | (-)१५५.२३ | (-)३९६२.६५ |
| ८. | महाराष्ट्र विद्युत विकास महामंडळ मर्यादित | (-)०.०६ | (-)१०१२.४७ |
| ९. | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित | (-)११६६.६४ | (-)५९४६.९९ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)१३२१.९३** | **(-)१०९२२.११** |
| **सेवा** | | | |
| १०. | महापर्यटन विकास महामंडळ मर्यादित | (-)०.०१ | (-)०.०७ |
| ११. | मुंबई मेट्रो रेल महामंडळ मर्यादित | (-)०.४४ | (-)०.७३ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)०.४५** | **(-)०.८०** |
| **एकूण अ (सर्व क्षेत्रनिहाय कार्यरत शासकीय कंपन्या)** | | **(-)१५४०.१४** | **(-)१४५७३.३२** |
| | | | |
| **ब) कार्यरत शासकीय कंपन्या** | | | |
| १२. | महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ मर्यादित | (-)५७२.६५ | (-)१२९४.३३ |
| **एकूण ब (सर्व क्षेत्रनिहाय कार्यरत शासकीय कंपन्या)** | | **(-)५७२.६५** | **(-)१२९४.३३** |

| अक्र | कंपनीचे नाव आणि क्षेत्र | या वर्षासाठीचा निव्वळ नफा/तोटा (सप्टेंबर २०१५) | तोट्यातील कंपन्यांचा एकूण संचयी तोटा |
|---|---|---|---|
| **क) अकार्यरत शासकीय कंपन्या** | | | |
| **कृषि आणि संलग्न कार्ये** | | | |
| १३. | मराठवाडा दुग्ध व्यवसाय विकास महामंडळ मर्यादित | (-)०.०००५ | (-)३.०९ |
| १४. | एलोरा दुग्ध उत्पादने मर्यादित | (-)०.००१ | (-)१.५२ |
| १५. | परभणी कृषी गो संवर्धन मर्यादित | (-)०.०३ | (-)१.०१ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)०.०३** | **(-)५.६२** |
| **वित्त** | | | |
| १६. | कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित | (-)०.१४ | (-)१.६१ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)०.१४** | **(-)१.६१** |
| **उत्पादन** | | | |
| १७. | महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित | (-)१३.६४ | (-)२९५.४८ |
| १८. | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित | (-)३७.८९ | (-)९१६.४२ |
| १९. | सह्याद्री ग्लास वर्कस् मर्यादित | (-)०.४१ | (-)९.२२ |
| २०. | दी गोंडवाना पेंटस् आणि मिनरल्स मर्यादित | (-)०.०००६ | (-)१.३४ |
| २१. | प्रताप कताई, विणाई आणि उत्पादन कंपनी मर्यादित | (-)०.०१ | (-)६३.८७ |
| | **क्षेत्रनिहाय एकूण** | **(-)५१.९५** | **(-)१२८६.३३** |
| | **एकूण क (सर्व क्षेत्रनिहाय कार्यरत शासकीय कंपन्या)** | **(-)५२.१२** | **(-)१२९३.५६** |
| | **एकूण** | **(-)२१६४.९१** | **(-)१७१६१.२१** |

*स्रोत : प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) III, महाराष्ट्र, मुंबई*

- **सप्टेंबर २०१५अखेर कार्यरत व कार्यरत नसलेल्या कंपन्यांचा निव्वळ तोटा २ हजार १६४ कोटी ९१ लाख रुपये होता. तर या तोट्यातील कंपन्यांचा संचित तोटा १७ हजार १६१ कोटी २१ लाख होता.**
- **कार्यरत असलेल्या वीज या कंपन्यांचा संचित तोटा १ हजार ३२१ कोटी १३ लाख रुपये होता.**
- **९ कार्यरत कंपन्यांचा संचित तोटा १० हजार ९२२ कोटी रुपये असून संचित तोट्यात या क्षेत्राचे प्रमाण ६३.६४ टक्के आहे.**

**अकार्यरत शासकीय कंपन्या म्हणजे पांढरे हत्ती असून ते सरकारने पोसण्यापेक्षा त्यांचे पुनरुज्जीवन करावे अथवा अशा अकार्यरत शासकीय कंपन्या बंद करण्यात याव्यात .**

# वर्ष २०१४-१५च्या शेवटच्या तीन महिन्यांतील झालेली खर्चाची घाई

## त्यातल्या मार्च महिन्यांत ५ हजार ९८१कोटी खर्च तर शेवटच्या ३ महिन्यात ७ हजार १६९ कोटींचा खर्च

(रु. कोटीत)

| अक्र | अनुदान क्रमांक | मुख्य शीर्ष | वर्षाचा एकूण खर्च | वर्षातील शेवटच्या तिमाहीतील खर्च | | मार्च २०१५ मधील खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | एकूण खर्चाची टक्केवारी | रक्कम | एकूण खर्चाची टक्केवारी |
| १. | ओ०१ | २०५३ - जिल्हा प्रशासन | १३८.९६ | ९६.५१ | ६९.४५ | ९१.३९ | ६५.७७ |
| २. | ए०४ | २०७० - इतर प्रशासकीय सेवा | ५९.१५ | ४०.५५ | ६८.५५ | ३३.८९ | ५७.३० |
| ३. | टी ०५ | २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य | १६०.३२ | १११.०३ | ६९.२६ | ८३.८१ | ५२.२८ |
| ४. | ओ२४ | २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता | २२.५९ | ११.८९ | ५२.६३ | ११.५५ | ५१.१३ |
| ५. | ओ२८ | २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता | ३२.९० | १९.९० | ६०.४९ | १९.९० | ६०.४९ |
| ६. | ओ३३ | २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता | २८.४० | १८.३७ | ६४.६८ | १८.३७ | ६४.६८ |
| ७. | टी ०५ | २२१५ -पाणी पुरवठा व स्वच्छता | ७६.४१ | ५८.८१ | ७६.९७ | ५६.८० | ७४.३४ |
| ८. | वाय०२ | २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता | ७३३.२२ | ५४६.७५ | ७४.५७ | ३८०.२९ | ५१.८७ |
| ९. | ओ२३ | २२१७ - शहर विकास | २९.९० | २१.८७ | ७३.१४ | १५.४४ | ५१.६४ |
| १०. | ओ२४ | २२१७ -शहर विकास | २६.७८ | २४.२८ | ९०.६६ | २०.१५ | ७५.२४ |
| ११. | टी ०५ | २२२५- अनुसूचित जाती, जमाती, इ. मा. वर्ग | १८३६.०५ | १२६६.१९ | ६८.९६ | १०१३.६५ | ५५.२१ |
| १२. | ओ४६ | २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण | २१.९६ | १४.२४ | ६४.८५ | १४.२४ | ६४.८५ |
| १३. | झेडई०१ | २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण | ११५.३३ | ८२.१० | ७१.१९ | ७७.२१ | ६६.९५ |
| १४. | एच०३ | २२१६-गृहनिर्माण | २४५.६५ | १६१.६६ | ६५.८१ | १५२.३२ | ६२.०१ |
| १५. | टी ०५ | २२३६-पोषण | २४.३० | २१.४५ | ८८.२७ | १९.६२ | ८०.७४ |
| १६. | टी ०५ | २४०३-पशु संवर्धन | २२.२३ | १७.३१ | ७७.८७ | १३.०० | ५८.४८ |
| १७. | टी ०२ | २४२५-सहकार | ५७.०८ | ५७.०८ | १००.०० | ५७.०८ | १००.०० |
| १८. | ओ१६ | २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम | ६०.५३ | ३०.९८ | ५१.१८ | ३०.७१ | ५०.७४ |
| १९. | आय०३ | २७०२-लघु पाटबंधारे | ५२.५५ | ३८.१६ | ७२.६२ | ३२.७७ | ६२.३६ |
| २०. | ओ२१ | २७०२-लघु पाटबंधारे | २०.०० | १२.८० | ६४.०० | १२.८० | ६४.०० |
| २१. | ओ२३ | २७०२-लघु पाटबंधारे | २०.३७ | १५.७१ | ७७.१२ | ११.१५ | ५४.७४ |
| २२. | टी ०५ | २७०२-लघु पाटबंधारे | ७०.७५ | ४४.९७ | ६३.५६ | ४१.६२ | ५८.८३ |
| २३. | के०७ | २८५३-गौण खनिज व गौण खनिज संपत्ती उद्योग | १७९.८३ | १६७.२९ | ९३.०३ | १६५.४१ | ९१.९८ |
| २४. | एच०५ | ३०५४-रस्ते व पूल | ३६०४.८४ | २२९०.८२ | ६३.५५ | १८४०.७२ | ५१.०६ |
| २५. | ओ२१ | ३०५४-रस्ते व पूल | ३३.३१ | २१.३१ | ६३.९७ | २१.३१ | ६३.९७ |
| २६. | ओ२३ | ३०५४-रस्ते व पूल | २२.०५ | १२.०५ | ५४.६५ | १२.०५ | ५४.६५ |
| २७. | टी ०५ | ३०५४-रस्ते व पूल | १८४.३३ | १५३.७३ | ८३.४० | १३७.५३ | ७४.६१ |
| २८. | ओ३८ | ३०५४- सचिवालय व आर्थिक सेवा | २३.३४ | १८.७६ | ८०.३८ | १४.४४ | ६१.८७ |

| अक्र | अनुदान क्रमांक | मुख्य शीर्ष | वर्षाचा एकूण खर्च | वर्षातील शेवटच्या तिमाहीतील खर्च | | मार्च २०१५ मधील खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | एकूण खर्चाची टक्केवारी | रक्कम | एकूण खर्चाची टक्केवारी |
| २९. | एल ०५ | ३६०४-स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतीराज संस्थांना सहाय्य | ११३४.१९ | ७८२.८१ | ६९.०२ | ६४३.३० | ५६.७२ |
| ३०. | बी १० | ४०५५-पोलिसांवरील भांडवली खर्च | २१.२२ | २१.२२ | १००.०० | २१.२२ | १००.०० |
| ३१. | टी ०६ | ४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च | २९.२६ | २९..२६ | १००.०० | २९.२६ | १००.०० |
| ३२. | टी ०६ | ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय यावरील भांडवली खर्च | १६७.२६ | १४७.३१ | ८८.०७ | १३३.२१ | ७९.६४ |
| ३३. | एक्स०३ | ४२३६-पोषण आहारावरील भांडवली खर्च | २३.७३ | २३.७३ | १००.०० | २३.७३ | १००.०० |
| ३४. | ओ१६ | ४४०२-मृद व जलसंधारणावरील भांडवली खर्च | ३०.९७ | ३०.५९ | ९८.७७ | २१.७६ | ७०.२६ |
| ३५. | टी ०६ | ४४०२-मृद व जलसंधारणावरील भांडवली खर्च | ७९.८७ | ७८.९९ | ९८.९० | ६५.९३ | ८२.५५ |
| ३६. | व्ही ०३ | ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च | २८४.०९ | २६६.७५ | ९३.९० | २६६.७५ | ९३.९० |
| ३७. | ओ२० | ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च | २२.१९ | १५.७१ | ७०.८० | १४.९६ | ६७.४२ |
| ३८. | सी १० | ४७०१-मुख्य व मध्य सिंचनावरील भांडवली खर्च | ३१.०८ | १९.३९ | ६२.३९ | १५.७८ | ५०.७७ |
| ३९. | एन०४ | ६२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय यांना कर्ज | १११.६६ | १०७.६८ | ९६.४४ | १०७.६८ | ९६.४४ |
| ४०. | सी १२ | ७६१०-सरकारी कर्मचाऱ्यांना कर्ज | ५३.५७ | ४३.८४ | ८१.८४ | ३५.८४ | ६६.९० |
| ४१. | आय०६ | ६००३-राज्य सरकारचे अंतर्गत ऋण | ३०१.३२ | २२५.८८ | ७४.९६ | २०२.९६ | ६७.३६ |
| | | | १०१९३.५४ | ७१६९.७६ | ७०.३३ | ५९८१.६० | ५८.६८ |

*स्रोत: विनियोजन लेखे मार्च २०१५*

- **निरनिराळ्या विभागांच्या मागण्यांतर्गत शेवटच्या तीन महिन्यात करण्यात आलेला खर्च ७ हजार १६९ कोटी आहे. तर त्यापैकी मार्च महिन्यात करण्यात आलेला खर्च ५ हजार ९८१ कोटी आहे.**

**शेवटच्या तीन महिन्यात अथवा शेवटच्या महिन्यात म्हणजे मार्च मध्ये निधी खर्च करण्याचे प्रमाण सातत्याने अधिक राहिले असून वर्ष संपत आले की घाईघाईने खर्च करण्याला शासनस्तरावर वेग येतो. हा निधी वेळेवर खर्च केला तर आदिवासी विकास विभाग, महिला बाल कल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग या विभागांवर वेळेत खर्च केला तर वंचित घटकांना न्याय मिळू शकतो.**

## शासकीय साहित्याची ८१ कोटी ७५ लाख रुपयांची चोरी व दुर्विनियोग

रु. लाखात

| अक्र | विभाग | चोरीची प्रकरणांतील रक्कम | दुर्विनियोग/शासकीय साहित्याच्या हानीची रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय | ५.७४ | ६६.२४ | ७१.९८ |
| २. | सहकार व वस्त्रोद्योग | ०.५३ | १०.८३ | ११.३६ |
| ३. | वित्त | १३.८९ | ४१८.४० | ४३२.२९ |
| ४. | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | ४.९७ | ३१.२८ | ३६.२५ |
| ५. | सामान्य प्रशासन | ० | २.५८ | २.५८ |
| ६. | उच्च व तंत्र शिक्षण | ० | ३२०.४९ | ३२०.४९ |
| ७. | गृह | ४.२५ | ४८०.१५ | ४८४.४० |
| ८. | गृहनिर्माण | ० | ०.०७ | ०.०७ |
| ९. | उद्योग, ऊर्जा व कामगार | ० | ०.९४ | ०.९४ |
| १०. | विधी व न्याय | ०.५७ | ०.५६ | १.१३ |
| ११. | मराठी भाषा | ० | २.६९ | २.६९ |
| १२. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | ० | १९.८० | १९.८० |
| १३. | नियोजन | ०.८९ | ०.१३ | १.०२ |
| १४. | सार्वजनिक आरोग्य | ०.०३ | ६२१९.१२ | ६२१९.१५ |
| १५. | सार्वजनिक बांधकाम | ० | ९.९४ | ९.९४ |
| १६. | महसूल व वन  विभाग | ३.४४ | ८३.३३ | ८६.७७ |
| १७. | ग्रामविकास व जलसंधारण | ३.५१ | २५८.२१ | २६१.७२ |
| १८. | शालेय शिक्षण आणि क्रीडा | ० | २.०३ | २.०३ |
| १९. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | ० | १४२.१९ | १४२.१९ |
| २०. | आदिवासी विकास | १.८ | ११.१४ | १२.९४ |
| २१. | जलसंपदा | २०.६२ | २८.८९ | ४९.५१ |
| २२. | पाणीपुरवठा व स्वच्छता | ६.७० | ० | ६.७० |
| | **एकूण** | **६६.९४** | **८१०९.०१** | **८१७५.९५** |

*स्रोत : संबंधित विभाग, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा) II- महाराष्ट्र, नागपूर  यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती*

- **चोरी, शासकीय साहित्याची हानी यामुळे २०१५ मध्ये रु. ८१ कोटी ७५ लाख ९५ हजाराचे नुकसान झाले त्यामध्ये चोरीला गेलेल्या प्रकरणातील रक्कम ६६ लाख ९४ हजार होती.**
- **सर्वात जास्त हानी सार्वजनिक आरोग्य विभागाची झाली असून ही रक्कम ६२ कोटी १९लाख  १२ हजाराची होती.**

# शासनाने माफ केला १ हजार कोटींचा महसूल

(रु. कोटीत)

| विभाग | योजनेचे नाव | माफ केलेल्या महसूल | शेरा |
|---|---|---|---|
| **महसूल व वन विभाग** | टंचाई सदृश्य परिस्थिती | १.०१ | जमीन महसुलाची माफी |
| | ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी करिता | १.८७ | जमीन महसुलाची माफी |
| | शेतसारा (जमीन महसूल) (सर्वसाधारण जमीन महसूल, अकृषक कर जिल्हा परिषद कर, ग्रा. पं. कर) | १८.१६ | जमीन महसुलाची माफी |
| **उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा)** | महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम १९५८ | ८६९.३९ | विद्युत शुल्क माफी |
| **गृह विभाग (परिवहन)** | मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८, कलम ८(अ) (४) खाली भरणा केलेल्या करावरील व्याजमाफी | ०.०५८३ | करावरील व्याजमाफी |
| | मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८, कलम ३(३) खाली  ना वापरात असलेल्या वाहनाबाबत उशीरा कळविलेल्या प्रकरणी माफ केलेला कर व व्याज | ०.१७३६ | कर व व्याजमाफी |
| **महसूल व वन विभाग (मुद्रांक शुल्क व नोंदणी)** | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहायभूत सेवा धोरण २०१५ | ५८.८५ | मुद्रांक शुल्क माफी |
| | पर्यटन धोरण २००६ | ०.८३ | मुद्रांक शुल्क माफी |
| | विशेष नगर वसाहत धोरण | २०.६२ | मुद्रांक शुल्क माफी |
| | झोपडपट्टी पुनर्वसन धोरण | १.४६ | मुद्रांक शुल्क माफी |
| | विशेष आर्थिक धोरण क्षेत्र धोरण | ०.९४ | मुद्रांक शुल्क माफी |
| | सहकार धोरण | २.३२ | मुद्रांक शुल्क माफी |
| | शैक्षणिक संस्थांचे माफी दिलेले दस्तऐवज | १.७८ | मुद्रांक शुल्क माफी |
| | इतर संकीर्ण धोरण | २७.२६ | मुद्रांक शुल्क माफी |
| | सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेश दि.२२.०७.१९९३ | ४.७६ | मुद्रांक शुल्क माफी |
| | कृषि पत धोरण | ०.६९ | मुद्रांक शुल्क माफी |
| | गृहनिर्माण धोरण | ८.०८ | मुद्रांक शुल्क माफी |
| | | **१०१८.२५** | |

*स्त्रोत: महाराष्ट्र राज्याचे  मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण पुस्तिका*

**वर्ष २०१५-१६ मध्ये  शासनाने  १ हजार १८ कोटी २५ लाखाचा महसूल माफ केला यामध्ये  उद्योग, ऊर्जा व कामगार अंतर्गत ऊर्जा विभागाचे विद्युत शुल्काची रक्कम ८६९ कोटी ३९ लाख एवढी मोठी होती. माफ केलेल्या महसूलामध्ये ही रक्कम ८५% पेक्षा जास्त.**

# महाराष्ट्र राज्याची ठळक वैशिष्ट्ये

## दृष्टिक्षेपात महाराष्ट्र :

- राज्याची लोकसंख्या १२ कोटी १० लाख असून त्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या ६ कोटी २३ लाख तर महिलांची लोकसंख्या ५ कोटी ३७ लाख आहे.
- भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे तर राज्यासाठी तो. ०.५७२ आहे.
- राज्यातील जन्मदर १६.३ असून देशात तो २०.८, राज्यात अर्भक मृत्यूदर ५.८ तर देशात ६.५ राज्यात मृत्यूदर २१ तर देशात ३७ आहे तर माता मृत्यूचे राज्यात प्रमाण ६८ तर देशात १६७ आहे.
- २७ जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक राज्याच्या एकूण मानव विकास निर्देशांकापेक्षा बराच कमी. नंदूरबार जिल्हा सर्वात पिछाडीवर (०.६०४)आहे.
- महाराष्ट्र राज्याचे स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ असून ते देशापेक्षा (९४३) कमी आहे. केरळ (१०८४), तामिळनाडू (९९६), कर्नाटक (९७३), उत्तर प्रदेश (९६३), मध्य प्रदेश (९३१) ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.
- राज्यातील २.२७% लोकांपर्यंत वीज पोहोचलेली नाही. तर ०.६६% लोक अंधारात राहतात म्हणजे त्यांच्याकडे घासलेट, तेल, सौर ऊर्जा किंवा इतर साहित्य ही नाही.
- डिसेंबर २०१६ पर्यंत २२,४२३ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध झाली मात्र त्यापैकी तांत्रिक, वाणिज्यिक व वितरण हानी अशी २८.९९ टक्के विजेची हानी झाली तर राज्यभरात ३९,२९० प्रकरणात वीज चोरी झाली.
- वर्ष २०१५-१६मध्ये १५,९४८ मेगावॅट युनिट विजेची मागणी होती. मात्र प्रत्यक्ष पुरवठा ९८ मेगावॅट भारनियमन करून भागविण्यात आली.

## राज्याची आर्थिक स्थिती :

- राज्याची महसुली जमा रु. २,२०,८१० कोटी अर्थसंकल्पीत केली असून मागील वर्षी म्हणजे २०१५-१६ मध्ये ती रु. १,९८,३२१ होती. तर महसुली खर्च रु. २,२४,४५५ आहे म्हणजे रु. ३,६४५ कोटी महसुली तूट येईल असा अंदाज आहे. तर २०१५-१६ मध्ये सुधारित महसुली तूट रु. ९,२९० कोटींवर आली आहे.
- राज्याचा कर महसूल रु. १,७५,८४९ कोटी असून करेतर महसूल रु. ४४,९६१ असा एकूण रु. २,२०,८१० आहे. (२०१६-१७)

- सन २०१५-१६ प्रमाणे महसुली तूट रु. ३,७५७ कोटी, वित्तीय तूट रु. ३०,७३३ कोटी, कर्ज रु. ३,३३,१६० कोटी आहे. वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी १.५६% असून कर्जाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १६.९२%अपेक्षित असून १४ व्या वित्त आयोगाने एकत्रित वित्तीय सुधारणेच्या मर्यादेत आहे.
- सन २०१६-१७ साठी स्थूल राज्य उत्पन्न रु.१८,१५,४९८ कोटी अपेक्षित.
- वर्ष २०१५-१६ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न रु. १,४७,३९९ होते. तर मागील वर्षी रु.१,३२,३४१ होते.
- राज्य शासनाने वेगवेगळ्या क्षेत्रात २०१४-१५ मध्ये दिलेल्या हमीची रक्कम रु. ८,२७३.६४ कोटींवर पोहोचली आहे.
- दरडोई उत्पन्नात इतर राज्यांशी तुलना करता कर्नाटकने आपल्याला मागे टाकले आहे. कर्नाटकचे दरडोई उत्पन्न रु.१ लाख ४८ हजार ४८५ आहे. तर महाराष्ट्राचे रु. १ लाख ४७ हजार ३९९ आहे. जे रु.१ हजार ८६ ने कमी आहे.
- स्वयं सहाय्यता गटांकडे वर्ष २०१६-१७ मध्ये रु. १,६९७ कोटी कर्ज थकित होते.
- नोव्हेंबर २०१६ पर्यंत राज्यात निरनिराळ्या उद्योग प्रकल्पांतर्गत ११ कोटी ३७ लाख ७८३ कोटींची गुंतवणूक होईल असे म्हटले होते. त्यापैकी केवळ २कोटी ६९ लाख ८१४ कोटींची (२३.७%) गुंतवणूक झाली आहे तसेच ८ हजार ६६४ प्रकल्प (४४.६%) कार्यान्वित झाले.
- राज्यात १ लाख ९७ हजार सहकारी संस्था असून त्यापैकी ३९ हजार ९९१ (२०.३%)सहकारी संस्था तोट्यात चालल्या आहेत.
- राज्यात बेरोजगारीच्या दराचे प्रमाण २.१% आहे.
- उद्योगामध्ये घट झालेली असून वर्ष २०१५-१६ मध्ये ७.५% असलेले प्रमाण ६.७% वर आले आहे. ही घट प्रामुख्याने खाण व दगडखाण, वस्तुनिर्माण व बांधकाम या क्षेत्रात झाली आहे.
- मुंबईचे दरडोई उत्पन्न रु.२ लाख ५८ हजार ७४९ आहे तर नंदुरबार सारख्या जिल्ह्यात दरडोई उत्पन्न केवळ रु. ६६ हजार ११० आहे. (सर्वात कमी - नंदुरबार, वाशिम व हिंगोली)
- १४व्या वित्त आयोगानुसार राज्याला केंद्राकडून वर्ष २०१६-१७ साठी रु. ६,६२९ कोटी मिळणार आहेत.
- वर्ष २०१६-१७ मध्ये कर्ज रु. ३,५६,२१६ कोटी असून व्याजाच्या परतफेडीसाठी रु. २८,२२० कोटी द्यावे लागणार आहेत.

- राज्याचा एकूण महसूली खर्च रु. २ लाख २४ हजार ४५५ असून वेतनासाठी रु. ७९,९४१ व निवृत्ती वेतनासाठी रु. २४,३७० तर व्याजापोटी रु. २८,२२० द्यावे लागणार आहेत.

- वर्ष २०१६-१७ मध्ये योजनेसाठी रु. ५६,९९७ कोटींची नियतव्यय निर्धारीत केला होता मात्र खर्च रु. ४५,७२१ कोटींचा झाला आहे म्हणजे योजनेतील खर्चात रु. ११,२७६ (१९.८०%) घट झाली आहे.

- राज्यातच सिंचन व बिगर सिंचन पाणी पट्टी आकारणी. वर्षाखेरीज रु. १,५१४.१५ कोटी थकित.

- महाराष्ट्रात १९४३७ औद्योगिक प्रस्ताव आलेत तसेच ११,३७,७८३ कोटींची गुंतवणूक करण्याचे ठरले आहे मात्र आपल्या शेजारील गुजरात राज्यात १३,३०८ औद्योगिक प्रस्ताव आलेत मात्र रु. १४,३६,९६२ कोटींची गुंतवणूक झाली आहे. महाराष्ट्रापेक्षा रु. २ लाख ९९ हजार १७९ कोटींची  गुंतवणूक गुजरातमध्ये अधिक झाली आहे.

- वर्ष २०१३-१४ मध्ये २९ हजार १२३  उद्योग कार्यरत होते. वर्ष २०१४-१५ मध्ये उद्योगांच्या संख्येत ५२२ने घट झाली आहे.

- वर्ष २०१५-१६ ला रोजगार हमी अंतर्गत एकूण मनुष्य दिवस निर्मिती ७.६३ कोटी होती. वर्ष २०१६-१७ डिसेंबर अखेरपर्यंत रोजगार हमी अंतर्गत एकूण मनुष्य दिवस निर्मिती ५.४७ कोटी इतकी होती. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत २.१६ कोटी मनुष्य दिवस निर्मितीत घट झाली आहे.

## राज्याची शैक्षणिक स्थिती :

- राज्याची लोकसंख्या १२ कोटी १० लाख असून त्यापैकी ३ कोटी ८ लाख (३३.८०%) व्यक्ती निरक्षर आहेत. त्यामध्ये महिलांची संख्या १ कोटी ७८ लाख ३५ हजार (१५.८%) आहे.

- राज्यात माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्यांची संख्या केवळ ४ कोटी ४७ लाख (३९.८% )आहे. म्हणजेच ६ कोटी ७७ लाख (६०.२%) व्यक्तीचे माध्यमिक शिक्षणही झालेले नाही.

- वर्ष २०१६-१७ मध्ये प्राथमिक शाळांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत ६ हजार ७५१ने वाढून १ लाख ४ हजार ९७० झाली. मागील वर्षी ती ९८ हजार २१९ होती. मात्र प्राथमिक शाळेतील पटसंख्या मागील वर्षी १ कोटी ६० लाख ४४ हजार होती त्यात २०१६-१७ मध्ये ९८ हजारांची घट झाली आहे.

- वर्ष २०१५-१६ मध्ये ७४ हजार ९७१ शाळाबाह्य मुले आढळून आलीत त्यापैकी २४ हजार २८९ मुले आजही शाळाबाह्यच आहेत. म्हणजेच शासन सर्वच शाळाबाह्य मुलांना शाळेत आणू शकलेली नाहीत.

- राज्यातील गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच अवर्षणप्रवण क्षेत्रातील विद्यार्थी व आदिवासी समाजातील ३५ लाख ९७ हजार विद्यार्थ्यांसाठी वर्ष २०१५-१६ मध्ये रु. ४४ कोटी ३० लाख खर्च करण्यात आले होते. मात्र २०१६-१७ मध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होऊन ती ४ लाख ९१ हजार झाली

म्हणजेच ३१ लाख ६ हजार विद्यार्थी - लाभार्थी घटलेले असून त्यांच्यावर होणाऱ्या खर्चातही मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. मागील वर्षी यासाठी ४४ कोटी ३० लाख खर्च करण्यात आले होते त्यामध्ये आता ३१ कोटी ३२ लाख रुपयांची घट झालेली दिसते.

- मुलींच्या शिक्षणासाठी हे शासन किती संवेदनशील आहे हे वेळोवेळी सांगत असते. मात्र मुलींना मिळणारा उपस्थिती भत्ता, अहिल्याबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना तसेच ११वी व १२वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत शिक्षण या योजनेसाठी २०१५-१६ मध्ये ९४ कोटी ५२ लाख रुपये खर्च झाला होता तर २३ लाख विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला होता. त्यात २०१६-१७ मध्ये केवळ १६ लाख ९१ हजार विद्यार्थिनींना लाभ मिळाला म्हणजे ६ लाख ५० हजार लाभार्थी विद्यार्थिनीची घट झाली तर खर्चही रु.१२ कोटी ४३ लाखांनी घटला.
- राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्त्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावरील ७३ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के आहे.
- राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३% आहे. मात्र त्याचवेळी अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७९.७% व अनुसूचित जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण त्याही पेक्षा कमी ६५.७% आहे.

## कृषि व संलग्न कार्य:

- सलग दोन वर्षे कृषि उत्पन्न घटल्याने या क्षेत्रावर विपरीत परिणाम कृषि व संलग्न कार्यक्षेत्रावर २.७% घट
- 'कृषि व संलग्न कार्य' क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत १२.५% वाढ अपेक्षित असून 'उद्योग व सेवा' क्षेत्रात अनुक्रमे ६.७% व १०.८%वाढ अपेक्षित आहे.
- राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी ५८ तालुक्यात अपुरा पाऊस.
- ऊसाच्या उत्पादनात २८% घट अपेक्षित.
- राज्यात एकूण उपलब्ध जलसाठा १८,०७२ (४४.४%).
- वर्ष २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवारासाठी ६,२०२ गावे निवडण्यात आली होती त्यापैकी १,८२८ गावे पाणी टंचाईमुक्त करण्यात अपयश आले आहे.
- सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन २०१६-१७ मध्ये ४.३० लाख मेगाटन होईल असा अंदाज आहे. मागील वर्षीच्या तुलनेत १.५० लाख टन घट झाली आहे.
- राज्यातील एकूण लोकसंख्येच्या ३७.१% लोक उत्पन्नासाठी शेतीवर अवलंबून आहेत तर ४४.३% लोक नोकरी वा तत्सम व्यवसाय करतात.

- जलशिवार योजनेसाठी २०१५-१६ मध्ये रु. ६,२०२ कोटी खर्च करण्यात आले होते व २,२६,२६६ कामे पूर्ण झाली होती मात्र २०१६-१७ मध्ये नोव्हेंबर पर्यंत रु. ५,२८१ कोटी खर्च करण्यात आले व कामे केवळ ३५,९०६ पूर्ण झालीत. मागील वर्षी ११,८२,२३० हजार घन मीटर जलसाठा निर्माण केला. मात्र यावर्षी जलसाठा किती निर्माण झाला याबाबत स्पष्टता नाही.

- राष्ट्रीय कृषि विकास योजनेसाठी केंद्राकडून २०१४-१५ मध्ये रु. ९४२.०९ कोटी, २०१५-१६ मध्ये रु. ७३० व कोटी २०१६-१७ मध्ये रु. ३३३.७३ कोटी प्राप्त झाले आहेत. म्हणजे केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या मदतीत टप्प्या-टप्प्याने घट झाली आहे.

## राज्याची सामाजिक स्थिती:

- महिलांवरील अत्याचारांसंदर्भात २०१५-१६ मध्ये ३१,१२६ गुन्हे नोंदविले आहेत. सन २०१६-१७ डिसेंबरपर्यंत ३२,५४८ गुन्हे नोंदविले आहेत. महिलांवरील अत्याचारांसंदर्भात यावर्षी प्रचंड वाढ झालेली दिसून येते.

- बालकांवरील अत्याचारांसंदर्भात २०१५-१६ मध्ये १३,९४१ गुन्हे नोंदविले आहेत. सन २०१६-१७ डिसेंबर पर्यंत १३,५९१ गुन्हे नोंदविले आहेत. मार्च २०१७ पर्यंत सरासरी विचार करता हा आकडा ४,५३० ने वाढून १८,००० पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था पार कोलमडून पडल्याचे वास्तव महिला व बालकांवरील अत्याचारांवरून सिद्ध होते.

- सन २०१५-१६ मध्ये अनुसूचित जातींसाठी नियतव्यय रु.६,४९० कोटी इतका होता. २०१५-१६ या वर्षी एकूण खर्च रु. ३,८५६.३२ कोटी इतका झाला. म्हणजेच नियतव्यय रकमेपेक्षा रु. २,६३३.६८ कोटी इतका खर्च कमी करण्यात आला. २०१६-१७ मध्ये नियतव्यय रु. ६,७२५.६५ कोटी इतका आहे व डिसेंबर २०१६ पर्यंत फक्त २,५६६.०१ इतकाच म्हणजे नियतव्यय रकमेपेक्षा ६५% कमी खर्च झाला.

- आदिवासी उपयोजनेअंतर्गत २०१५-१६ मध्ये नियतव्यय रु. ५,१७० कोटी इतकी होती. व खर्च रु. ४ हजार ५६२ कोटी ५५ लाख झाला. तर २०१६-१७ मध्ये नियतव्यय रक्कम रु.५ हजार ३५७ कोटी ७२ इतकी होती व डिसेंबर २०१६ पर्यंत खर्च फक्त रु. १ हजार ७०१ कोटी ४५ लाख इतका झालेला होता.

- नागरी आदिवासी वस्ती सुधार योजनेसाठी सन २०१६-१७ मध्ये रु. ७ कोटी नियतव्यय दाखविलेला आहे. डिसेंबर २०१६ पर्यंत यामधील एक रुपयाही खर्च झालेला नव्हता. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रमासाठी रु. २१२.३० कोटी नियतव्यय दाखविण्यात आलेला आहे. डिसेंबर २०१६ पर्यंत फक्त ५.०३ कोटी इतकाच निधी खर्च करण्यात आलेला आहे. आदिवासी विभाग, आदिवासी उपयोजना व एकंदरीत आदिवासींच्या असलेल्या योजनांचा विचार करता युती शासन आदिवासी विभागाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे वास्तव समोर येते.

*स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६-१७*